राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत सह आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) (वेतनश्रेणी-एस-२५ : ७८८००-२०९२००) हे नवीन पद निर्माण करणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन आदेश क्रमांक :- इएसटी-२७२१/प्र.क्र.१६७/राउशु-१**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १३ मार्च, २०२४.

**वाचा:** १) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.इएसटी-२००२/सीआर-९६/इएसक्ससी-४, दि.०१.०१.२००३
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.इएसटी-१६१६/प्र.क्र.२००/राउशु-१,दि.०२.०९.२०२१
३) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.बीजीटी-१०२१/प्र.क्र.९६/राउशु-१,दि.०५.०१.२०२२

**प्रस्तावना:**

राज्य उत्पादन शुल्क विभागातील पदांचा सुधारीत आकृतीबंध संदर्भ क्र.२ व ३ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. त्यात आयुक्तालय स्तरावर संचालक (अंमलबजावणी व दक्षता) हे पद कार्यरत असून ते राज्यातील अवैध मद्य निर्मिती /वाहतुक/विक्री इत्यादीवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असतात. त्यानुषंगाने प्रादेशिक विभागीय स्तरावरील तसेच जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने सदर राज्यस्तरीय पद वरीष्ठ दर्जाचे असणे हे शासन महसूलाच्या व प्रशासकियदृष्टया गरजेचे असल्याने उपआयुक्त दर्जाचे संचालक (अंमलबजावणी व दक्षता) हे पद रद्द करुन सह आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) हे नवीन पद निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयात “संचालक (अंमलबजावणी व दक्षता) (वेतनश्रेणी-एस-२३ : ६७७००-२०८७००)” हे पद रद्द करुन “सह आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) (वेतनश्रेणी-एस-२५ : ७८८००-२०९२००)” हे नवीन पद निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्य उत्पादन शुल्क विभागात सह आयुक्त संवर्गात, सह आयुक्त (प्रशासन) व सह आयुक्त (मळी व मद्यार्क) अशी दोन पदे मंजूर आहेत. आता, सह आयुक्त संवर्गात, सह आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) हे नवीन पद मंजूर करण्यात येत असून सदर संवर्गात एकूण तीन पदे राहतील.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग अनौ.सं.क्र.४४७/आपुक, दि.२४.०८.२०२३ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन उच्चस्तरीय सचिव समितीने दि.३०.१०.२०२३ रोजी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन तसेच मा.मंत्रिमंडळाच्या दि.११.०३.२०२४ रोजीच्या बैठकीतील मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक २०२४०३१३१९४२४४३०२९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA
DIGAMBARRAO AUTE

Digitally signed by RAVINDRA DIGAMBARRAO AUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=f05a6913f9dee1f453c9a1c5a89d8c4897737ba8e4ac0edf3f2c6e69e25f4108, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=CA98EFAC317508AB9B5820B47955BC1BABB173F20D25ABD816ED91A9B6B0F16C, cn=RAVINDRA DIGAMBARRAO AUTE
Date: 2024.03.14 11:11:41 +05'30'

**( रविंद्र औटे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (राज्य उत्पादन शुल्क), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा व लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०.सर्व विभागीय आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
११.सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
१२.अवर सचिव/ कक्ष अधिकारी (राउशु-२/राउशु-३), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती (राउशु-१)